# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### एमएमआरडीएने ठाणे घोडबंदर-गायमुख बायपास मार्ग प्रकल्प राबविण्याबाबतचा घेतलेला निर्णय

**(१) २२८ (२३-१२-२०१४). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे-घोडबंदर रोडवरील वाहतुकीची कोंडी सोडविण्यासाठी एमएमआरडीएकडून घोडबंदर-गायमुख बायपास मार्ग महत्वकांक्षी प्रकल्प राबविण्याचा निर्णय घेतला असल्याचे माहे जुलै, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पास केंद्र शासनाकडून परवानगी मिळालेली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरचा महत्वाकांक्षी प्रकल्पास केंद्र शासनाकडून पाठपुरावा करुन लवकरात लवकर पूर्ण करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-१०-२०१५) :**(१) ठाणे महानगरपालिकेच्या विकास आराखड्यातील गायमुख ते बाळकुम घोडबंदर बायपास रस्त्याच्या कामास मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे माहे डिसेंबर, २००७ मध्ये प्रशासकीय मान्यता दिली आहे.

(२), (३) व (४) सदर रस्त्यांच्या आखणीतील काही लांबी नौदलाच्या आवार भिंतीस समांतर जात असल्याने नौदालाच्या अधिकाऱ्यांसमवेत सदर रस्त्यासाठी परवानगी मिळविण्यासाठी बैठका तसेच प्रत्यक्ष पाहणी करुन वेगवेगळे पर्याय सुचविण्यात आले. तथापि, नौदलाने या रस्त्याच्या आखणीस परवानगी नाकारली आहे. तसेच महाराष्ट्र सागरी किनारा व्यवस्थापन प्राधिकरण MCZMA यांनी देखील या आखणीस आक्षेप घेऊन पर्यायी आखणी करणेबाबत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास सूचित केले आहे. सदर बाब मुंबई महानगर प्रदेश

विकास प्राधिकरणाकडून ठाणे महानगरपालिका यांना अवगत करण्यात आले आहे. सदर रस्त्याची पर्यायी आखणी निश्चित करण्याबाबतची कार्यवाही ठाणे महानगरपालिकेच्या स्तरावरुन सुरु आहे.

---

**राज्यातील व्यवसाय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना बस प्रवास सवलत मिळण्याबाबत**

**(२) १६७४ (२२-१२-२०१४). श्री.सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्व शैक्षणिक संस्थामध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना बसप्रवास सवलत मिळत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील व्यवसाय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना सदर सवलत बंद असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर सवलत पुर्ववत सुरु करावी या मागणीचे पत्र मा.उच्च व तंत्रशिक्षण मंत्री यांनी मा. मुख्यमंत्री यांच्याकडे पाठविले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर पत्रावर कोणता निर्णय घेण्यात आला वा घेण्यात येणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-११-२०१५) :**(१) अहिल्याबाई होळकर मुलींना मोफत प्रवास योजना अंतर्गत इयत्ता ५ ती ते १० वी पर्यन्तच्या विद्यार्थिनींना, एस.टी.ने मोफत प्रवास करण्याची सवलत देण्यात आली आहे. तसेच, शालेय विद्यार्थ्यांककरिता राबविण्यात येणा-या सवलतीच्या योजनांवरील बसप्रवास सवलतीकरिता महालेखापाल कार्यालयाच्या मान्यतेने नवीन लेखशिर्ष उघडण्यात आला असून निधी उपलबधतेकरिता शासवन-स्तरावर कार्यवाही चालू आहे.

(२) ते (४) राज्यातील व्यवसाय शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांना महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन मंडळाच्या बस सेवेच्या सवलतीसाठी तरतूद करण्याचे प्रस्तावित असून, विद्यार्थ्यांना त्याचा लाभ देण्यासाठी महालेखापाल कार्यालयाच्या मान्यतेने नवीन लेखाशिर्ष उघडण्यात येत आहे. नवीन लेखशिर्षास महालेखापाल कार्यालयाने मान्यता दिल्यासवर व्यवसाय शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांना देण्यात येणा-या बस सवलतीच्या मुल्याची प्रतिपूर्ती करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील झोपडपट्टी पुर्नविकास (झोपु) योजनेअंतर्गत बांधण्यात आलेल्या इमारतीमधील घरे किमान दहा वर्षे विकत येत नसूनही प्रत्याक्षात घरे छुप्या मार्गाने विकली जात असल्याबाबत**

**(३) ५८९६ (०७-०४-२०१५). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील झोपडपट्टी पुर्नविकास (झोपु) योजनेअंतर्गत बांधण्यात आलेल्या इमारतीमधील घरे किमान दहा वर्षे विकता येत नसली तरी सुध्दा प्रत्यक्षात इमारतीमधील घरे छुप्या मार्गाने विकली जात असल्यामुळे गरीब व सर्वसाधारण कुटुंबाना त्रास सहन करावा लागत असून घरे हस्तांतरणामुळे शासनाचा लाखो रुपयांचा महसूलही बुडत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या सुमारास उघडकीस आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुर्नविकास (झोपू) योजनेअंतर्गत बांधण्यात आलेली घरे दहा वर्षात न विकण्याची अट शिथिल करण्याबाबत शासन कोणती कार्यवाही करणार आहे वा करीत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता (०९-०९-२०१५) :**(१) झोपडीवासियांचे जिवनमान सुधारावे या हेतूने सर्व सोयी-सुविधांयुक्त मोफत घर झोपडपट्टी पूनर्वसन योजनेच्या माध्यमातून देण्यात येते. झोपडीवासियांना दिलेल्या सदनिकांची लगेच विक्री/हस्तांतर झाल्यास झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचा उद्देश सफल होणार नाही. त्यामुळे महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सु.नि.व.पु.) अधिनियम, १९७१ च्या कलम ३ E आणि बृहन्मुंबई विकास नियमावली १९९१ कलम ३३(१०) मधील परिच्छेद १.१८ मधील तरतुदीनुसार झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत पुनर्वसन इमारतीमधील सदनिका गाळा भोगवट प्रमाणपत्र प्राप्त झाल्यापासून १० वर्षापर्यंत हस्तांतरण करण्यास निर्बंध योग्यच आहेत.

मा. मुंबई उच्च न्यायालयाने रिट याचिका क्र. ५८१/२०१२ मध्से दि. १९.११.२०१२ रोजी पारित केलेल्या आदेशामध्ये पुनर्वसन सदनिकांचे १० वर्षांनंतर हस्तांतरण करण्यासाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने आवश्यक असल्यास राज्यशासनाशी परामर्ष करुन कार्यपध्दती निश्चिती करावी, असे आदेश दिले होते. त्या अनुषंगाने झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून प्राप्त प्रस्तावास शासन स्तरावरुन दि. १७.०९.२०१३ रोजीच्या पत्रान्वये मान्यता देण्यात आली आहे. त्यास अनुसरुन झापेडपट्टी पुनर्वसन प्राणिकरणाने दि. २४.१०.२०१३ रोजी त्याबाबतचे परिपत्रक क्र. १४५ निर्गमित केले आहे.

जनहित याचिका क्रमां ११९/२००९ व १४३/२००९ मधील मा. मुंबई उच्च न्यायानयाचे निर्देश विचारात घेवून अवैध हस्तांतरण रोखण्याकरिता व अवैध हस्तांतरणाच्या प्रकरणी निष्कसनावी कार्यवाही करुन गाळा ताब्यात घेण्यात येण्याची कार्यवाही करण्यासाठी दि. १९ मे, २०११ रोजीच्या परिपत्रक क्र. १२५ झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत उपजिल्हाधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांच्याअधिपत्याखाली दक्षता पथक स्थापन करण्यात आले आहे.. सदर दक्षता पथकामार्फत दहा वर्षाच्या आतील हस्तांतरण प्रकरणी निष्कासनाची कारवाई करण्याच्या अनुषंगाने आवश्यक तो अहवाल सक्षम प्रधिकारी यांचेकडे पाठविण्यात येते. सक्षम प्राधिकारी यांचेकडून निष्कासनाची कारवाई करुन सदनिका ताब्यात घेण्यात येतात.
(२) याबाबतचा कोणताही प्रस्ताव शासनाच्या विचाराधिन नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे जिल्ह्यातील पुणे शहराजवळीत गावठान हद्दीमध्ये वाढ करण्याबाबत

**(४) ६२७७ (०७-०५-२०१५). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील पुणे शहराजवळीत गावठान हद्दीमध्ये वाढ करण्याच्या निर्णयावर दिनांक २ जानेवारी, २०१५ पासून नगररचना विभागाकडे हरकती सुनावणी झाल्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे शहरालगतच्या गावांनी गावठानाच्या निवासी क्षेत्रवाढीसाठी लोकसंख्येचा निकष लावू नये अशी हरकत नोंदविली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, पुणे शहरालगतच्या व ग्रामीण भागातील गावठानांच्या २ कि.मी. ने हद्द वाढ करण्याबाबत ग्रामस्थांनी मागणी नोंदविली, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील अनेक नव्याने स्थापन झालेल्या ग्रामपंचायतींना गावठान हद्द निश्चित करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, राज्यातील नवीन ग्रामपंचायतींची गावठान हद्द ठरविणेबाबत व २ कि.मी ने गावठान हद्द वाढ करण्याबाबत शासनस्तरावरुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-१०-२०१५) :**(१) ते (६) मंजूर प्रादेशिक योजना-पुणे च्या नियमावलीमध्ये गावांच्या नैसर्गिक विस्तारासाठी त्या गावांच्या सन १९९१ च्या जनगणनेनुसारच्या लोकसंख्या सापेक्ष शेती तथा ना विकास विभागामध्ये संबंधित गावांच्या गावठाण्याच्या हद्दीपासून त्या सभोवताली उक्त नियमावलीतील तरतूदीनुसार ठरावीक अंतरापर्यंत रहिवास वापर अनुज्ञेय करण्याची तदतूद आहे. शासनाने सूचना क्र. टिपीएस-१८१२/१००६/प्र.क्र.१२६/१३/नवि-१३, दि.९/७/२०१४ अन्वये फेरबदलाव्दारे शेती तथा ना-विकास विभागात गावठणापासून २००/५००/१५०० अंतरात सन १९९१ च्या ऐवजी अलिकडील जनगणनेनुसारची लोकसंख्या विचारात घेऊन रहिवास वापर अनुज्ञेय करण्याचे प्रस्तावित केले आहे.

प्रसिध्द सूचनेच्या अनुषंगाने नियुक्त अधिकारी तथा सहायक संचालक नगर रचना, पुणे शाखा, पुणे यांच्याकडे एकूण ९३ सूचना प्राप्त आहेत. त्यामध्ये २३ ग्रामपंचायतींनी सूचना/हरकती दाखल केलेल्या आहेत. सर्वसाधारणपणे दाखल करण्यात आलेल्या हरकती/सूचनांमध्ये लोकसंख्यासापेक्ष अंतर न ठेवता सरळ सरळ दीड ते दोन कि.मी. पर्यंत अंतर गावठाणापासून ठेवण्याची मागणी केली आहे.

नियुक्त अधिकारी यांनी दिनांक ०२/०१/२०१५ रोजी सुनावणी दिली असून त्यांनी शासनास अहवाल सादर केलेला आहे. उक्त प्रसिध्द झालेल्या सूचनेच्या सदर अहवाल विचारात घेऊन शासनाने प्रसिध्द केलेला प्रस्ताव मंजूरीच्या अंतिम टप्प्यात आहे.

---

**अंधेरी (पूर्वे), मुंबई येथील गुंदवली परिसरात पश्चिम द्रुतगती महामार्गाला लागून असलेल्या मोक्याच्या जागेवरील महाकाली दर्शन या झोपडपट्टी पुनर्विकासाबाबत**

**(५) ६५६९ (०६-०४-२०१५). श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री. सुनिल शिंदे (वरळी), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंधेरी (पूर्वे), मुंबई येथील गुंदवली परिसरात पश्चिम द्रुतगती महामार्गाला लागून असलेल्या मोक्याच्या जागेवरील महाकाली दर्शन या झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरणातंर्गत असलेल्या प्रकल्पाचे काम पूर्ण झाले आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पामध्ये किती इमारती बांधल्या जाणार आहेत व किती कालावधीत प्रकल्पाचे काम पूर्ण होऊन सदर झोपडपट्टीतील किती रहिवाश्यांना सदनिकांचे वाटप करण्यात येणार आहे,

(३) असल्यास, सन २००६ पासून या प्रकल्पाचे कामे सुरू असतांनाही पूर्ण झालेली नाही हे ही खरे आहे काय

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता (०१-०९-२०१५) :**(१) मौजे गुंदवली, अंधेरी पूर्व येथील न.भू.क्र.७८ व ७९ या खाजगी मालकीच्या भुखंडावर महाकाली दर्शन महाकाली दर्शन-अ या सहकारी गृहनिर्माण संस्थांचे झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचे काम पूर्ण झालेले नाही.

(२), (३) व (४) सदरहू झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमध्ये ८ पुनर्वसन इमारती व १ विक्री घटकातील इमारत अशा एकूण ९ इमारती प्रस्तावित आहे. सदरहू झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमध्ये एकूण १७८१ पात्र झोपडीधारकांचे पुनर्वसन करण्यात येणार आहे. या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या कामामध्ये प्रगती दिसून न आल्यामुळे मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांनी या बाबतीत महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सु.नि.व.पु.) अधिनियम, १९७१ च्या कलम १३(२) नुसार दिनांक ११.६.२०१५ रोजी सुनावणी घेवून दिनांक २९.६.२०१५ रोजीच्या आदेशान्वये या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचे विकासक मे.सनशाईन बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स यांची नियुक्ती रद्द करण्यात आली असून योजनेमध्ये समाविष्ट असणाऱ्या सहकारी गृहनिर्माण सस्थांना दोन महिन्याच्या आत निवडणूक घेवून पुढील एक महिन्यात नवीन विकासकाची नियुक्ती करण्याबाबत कळविण्यात आले आहे. नवीन विकासकाची नियुक्ती झाल्यानंतर योजना पूर्णत्वाचा कालावधी निश्चित करणे शक्य होईल.

---

**राज्यातील १४ महानगरपालिका तसेच २२ नगरपालिकांनी झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत गरिबांना घरे देतांना जवाहरलाल नेहरु नागरी पुनरुत्थान मिशनबाबत**

**(६) ६६२६ (०६-०४-२०१५). श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.प्रशांत बंब**

**(गंगापूर), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राज पुरोहित (कुलाबा), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील १४ महानगरपालिका तसेच २२ नगरपालिकांनी झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत गरिबांना घरे देतांना जवाहरलाल नेहरु नागरी पुनरुत्थान मिशनच्या अटींचे उल्लंघन केल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकारामुळे राज्यातील बहुतांश शहरात पैसे खर्च होऊनही झोपडपट्टीधारकांना घरेच मिळाली नाहीत, यातील ४० हजार घरे पैसे खर्च झाल्यावरही सात वर्षात पूर्ण होऊ शकलेली नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता (०१-०९-२०१५) :**(१) या योजनेसंबंधी प्राप्त होणाऱ्या तक्रारीबाबत संबंधित महानगरपालिका / नगरपालिका / सुकाणू अभिकरण व राज्य शासनातील गृहनिर्माण विभाग / नगर विकास विभागामार्फत वेळोवेळी निराकरण करण्यात येते.

(२) माहे जून, २०१५ च्या अखरे जवाहरलाल नेहरू नागरी पुनरुस्थान योजने अंतर्गत एकूण २१७६९० घरकुले मंजूरअसून ५६८२७ घरकुले प्रगतीपथावर असून १०६७४८ घरकुले पूर्ण झालेली आहेत. त्यापैकी ६५९०७ घरकुलांचा ताबा दिलेला आहे. सध्या या योजनेतील घरे पूर्ण करण्यासाठी केंद्र शासनाने मार्च २०१७ पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे.

(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**महानगरपालिका क्षेत्रातील कंडोमिनियम अंतर्गतची कामे**
**करण्यास मंजुरी मिळण्याबाबत**

**(७) ६८८९ (०६-०४-२०१५). श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिडकोने नवी मुंबई क्षेत्रात २०-२५ वर्षापूर्वी बांधलेल्या सदनिका व बैठया चाळी यांची छोटया -छोटया कंडोमिनियममध्ये विभागणी केली असल्याने व शासनाच्या परिपत्रकानुसार कंडोमिनियम अंतर्गतची कामे नवी मुंबई महानगरपालिका करू शकत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कंडोमिनियम अंतर्गत असलेल्या जल व मलनिःस्सारण वाहिन्या निकामी झाल्या असल्यामुळे संपूर्ण परिसरात दुर्गंधी पसरलेली असून सदर जल व मलनिःस्सारण वाहिन्यांची कामे करण्यात यावी म्हणून स्थानिक नागरीकांनी नवी मुंबई महानगरपालिकेकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरची कामे करण्यास मंजुरी मिळावी म्हणून महानगरपालिकेने जुन २०१४ मध्ये प्रस्तावाद्वारे व स्थानिक लोकप्रतिनिधींनी जानेवारी, २०१५ मध्ये निवेदनाद्वारे शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रस्ताव व निवेदनाच्या अनुषंगाने मंजुरी देण्याबाबत शासन स्तरावरून काय कार्यवाही करण्यात आली आहे,

(५) नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०९-२०१५) :**(१), (२), व (३) होय,

(४) व (५) शासन परिपत्रक, नगर विकास विभाग क्र. एएमसी-१४२००/२२६४/प्र.क्र.१४४/नवि,२४, दिनांक २६ फेब्रुवारी, २००१ अन्वये महानगरपालिका नगरसेवक स्वेच्छा निधीतून घ्यावयाच्या कामासंदर्भात मागदर्शक तत्वे विहित करण्यात आली आहेत, त्यानुसार खाजगी संस्थांची/सहकारी संस्थांची/वैयक्तिक लाभधारकांची कामे नगरसेवकांच्या स्थानिक विकास कार्यक्रमाच्या मार्गदर्शक तत्वात बसत नसल्याने नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील कंडोमिनियम अंतर्गत कामांबाबतचा महानगरपालिकेचा प्रस्ताव शासनाने अमान्य केला आहे.

---

## बुलढाणा नगरपालिकामार्फत घरकुलाचे काम पूर्ण करण्यासंदर्भात एका महिलेने आत्मदहनाचा प्रयत्न केल्याबाबत

**(८) ७८९४ (०६-०४-२०१५). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा नगरपालिकामार्फत घरकुलाचे काम पूर्ण करण्यासंदर्भात एका महिलेने आत्मदहनाचा प्रयत्न केल्याचा दिनांक १७ नोव्हेंबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने कोणती चौकशी केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता (०९-०९-२०१५) :**(१) होय.

श्रीमती भारती शिवदास सोमवेशी यांनी जुनी वार्ड क्र.१० डॉ.बाबासाहेब आंबेडकर नगर बुलढाणा येथील घरकुल योजना अंमलात न आल्यास दि.१७ नोव्हेबर, २०१४ रोजी नगरपालिका कार्यालयासमोर आत्मदहन करण्याबाब दि. ११.११.२०१४ च्या निवेदनाद्वारे इशारा दिलेला होता व तसा संबंधित पहिलेकडून आत्मदहनाबाबतचा प्रयत्नही झाला आहे.

(२) सदर प्रकरणी आत्मदहन कार्यांना आत्मदहन करण्यापासून प्रतिबंधित करण्यात आले आहे. त्यांचेविरुध्द बुलढाणा शहर पोलीस ठाणे येथे उप.क्र. २१४/२०१४ भादंदि कलम ३०९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून दि.१३.१.२०१५ रोजी आरोपीविरुध्द या विशेष न्यायदंडाधिकारी, बुलढाणा यांचे न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. आरोपीविरुध्द फौजारी प्रक्रिया संहिता कलम १०७,११६(३) प्रमाणे प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्यात आली आहे. प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### मुंबईचे केईएम रुग्णालयात देशभरातून रुग्ण उपचारासाठी येत असून वाढत्या रुग्णांमुळे रुग्णालयात खाटांची कमतरता होत असल्याबाबत

**(९) ८८६७ (०७-०४-२०१५). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईचे केईएम रुग्णालय प्रसिध्द असून येथे देशभरातून रुग्ण उपचारासाठी येत असल्यामुळे रुग्णांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होत आहे व वाढत्या रुग्णांमुळे रुग्णालयात खाटांची कमतरता जाणवत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रुग्णालयाच्या अतिदक्षता विभागातील रुग्णांच्या गर्दीमुळे खाटा कमी पडतात व बऱ्याच वेळी रुग्णांना खाली बसवून अथवा स्ट्रेचरवर अथवा रुग्णांच्या नातेवाईकांना बसण्यासाठी असलेल्या बाकावर उपचार होत असतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अशा असुविधामुळे रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांमध्ये भिती व चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे, याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली अथवा करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०९-२०१५) :**(१) के.ई.एम. रुग्णालयात येणाऱ्या रुग्णसंख्येत कमी जास्त वाढ होत असल्यामुळे बृहन्मुंबई महानगरपालिकेने आपत्कालीन अतिदक्षता विभागाचे नुतनीकरण करुन सदर विभाग अद्ययावत केलेला आहे. तसेच सदर रुग्णालयातील खाटांची संख्या १८०० वरुन २२५० पर्यंत वाढविण्यात आली आहे.

(२) व (३) नुतनीकरण केलेला आपत्कालीन अतिदक्षता विभाग ६० खाटांचा असल्यामुळे रुग्णांवर खाली बसवून अथवा रुग्णांच्या नातेवाईकांना बसण्यासाठी असलेल्या बाकावर बसवून उपचार होत असतात हे खरे नाही. त्यामुळे रुग्णांत किंवा त्यांच्या नातेवाईकांमध्ये भितीचे व चिंतेचे वातावरण बसते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### पुणे जिल्हयातील कोरेगांव पार्क विभागामध्ये बेकायदा मल्टीप्लेक्स थिएटर सुरु असल्याबाबत

**(१०) ९२१५ (०४-०४-२०१५). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयातील कोरेगाव पार्क भागातील कोरेगाव प्लाझा मॉलमध्ये असेम्बली हॉल आणि फुड कोर्टची परवानगी असताना तेथे बेकायदा मल्टीप्लेक्स थिएटर सुरू करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित मॉलच्या व्यवस्थापनावर कोणती कारवाई करण्यात आली,

(३) ज्या कालावधीपासून मल्टीप्लेक्स थिएटर वापरात आहे तेव्हापासूनचा शासनाचा महसुलाची आकडेवारी उपलब्ध आहे काय,

(४) असल्यास, बेकायदेशिररित्या मॉलमध्ये मल्टीप्लेक्स थिएटर चालू असून त्या दोषी मल्टीप्लेक्स थिएटर चालकाला पाठीशी घालणा-या अधिका-यांवर अद्यापपर्यंत कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, पुणे शहरात किती मल्टीप्लेक्स थिएटरच्या नोंदी शासनाकडे उपलब्ध आहे आणि कोणत्या, तसेच बेकायदेशिररित्या किती मल्टीप्लेक्स थिएटर चालकांच्या नोंदी शासनास प्राप्त आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०९-२०१५)** :(१) होय, या ठिकाणी असेम्बली हॉलसाठी बांधकाम परवानगी पुणे महानगरपालिकेने दिनांक ८.७.२०११ रोजी दिली असून, भोगवटापत्र पार्ट-१, दिनांक २६.१२.२०११ व भोगवटापत्र पाट-२ दिनांक २१.६.२०१२ अन्वये दिले आहे.

(२) सदर मॉल मध्ये परवागनगी न घेता केलेल्या बांधकामावर पुणे महानगरपालिकेने खालीलप्रमाणे सुचनापत्र बजावून त्या अन्वये कारवाई केली आहे.

i) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील २६० (१) कलम नुसार तसेच दिनांक ५.१२.२०१४ अन्वसे ii) महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ५३(१) दिनांक २३.१२.२०१४ iii) सदर प्रकरणी संबंधित विकासक यांनी महानगरपालिकेच्या कारवाई विरोधात स्पेसि सु.क्र. १५८/१५, दावा दाखल केला असून, मा. उच्च न्यायालयाने मनाई हुकुम दिलेला आहे.

(३) होय. दिनांक ३१ मार्च, २०१५ पर्यंत थिएटरचे शो टॅक्सची रक्कम १८,६९,६००/- इतकी भरलेली आहे. तसेच सदर मिळकतीची मिळकतकरापोटी २०,०४,४७२/- रुपये जमा असुन रुपये ५,१६,०२५ इतकी मिळकतकर थकबाकी आहे.

(४) उक्त प्रश्न भाग २ च्या उत्तरात स्पष्ट केल्याप्रमाणे सदर प्रकरणी पुणे महानगरपालिकेतर्फे कार्यवाही करण्यात आली आहे. तथापि, सदर प्रकरणी मा. उच्च न्यायालयाने मनाई हुकूम दिलेला आहे. सदर प्रकरणी महानगरपालिकेतर्फे कार्यावाही केलेली असल्याने कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(५) पुणे महानगरपालिकेच्या हद्दीत करआकारणी झालेल्या मल्टीप्लेक्स थिएटरची संख्या १६ असून एकूण स्क्रीनची संख्या ७७ इतकी आहे.

---

**शासनाने नविन कायद्याप्रमाणे २००० सालापर्यंतच्या झोपडयांना ओळखपत्र देण्याबाबत**

**(११) ९७३२ (०६-०४-२०१५). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने नविन कायद्याप्रमाणे २००० सालापर्यंतच्या झोपडयांना ओळखपत्र देण्यात यावे,यासाठी मुंबईतील घाटकोपर (प.) येथे मेळावा घेतला असल्याचे दिनांक १८ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, झोपडीधारकांच्या या मागणीवर शासनाने काय निर्णय घेतला आहे वा घेण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता (०१-०९-२०१५) :**(१) अशी वस्तुस्थिती नाही.

(२) महाराष्ट्र शासन, गृहनिर्माण विभाग, शासन निर्णय क्र. झोपघो-१००१/प्र.क्र.१२५/१४/ झोपसु-१, दि.१६ मे, २०१५ नुसार दि.१.१.२००० अथवा त्यापूर्वीची झोपडी संरक्षणपात्र ठरविण्याबाबत तसेच त्यात प्रत्यक्ष राहणाऱ्या झोपडीवासियांचा निवारा निश्चित करण्याबाबत शासन निर्णय झालेला आहे. त्यानुसार संबंधित उपजिल्हाधिकारी (अति./निष्का.) तथा सक्षम प्राधिकारी, यांच्या कार्यालयाकडून कार्यावाही चालू आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबईतील सांताक्रुझ विमानतळालगतच्या झोपडपट्याचे एसआरए योजनेच्या नावाखाली घरांचा छुपा सर्व्हे करण्यात येत असल्याबाबत**

**(१२) ९८०० (०७-०४-२०१५). श्री.संजय पोतनीस (कलिना), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.रमेश लटके (अंधेरी पूर्व) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील सांताक्रुझ विमानतळालगतच्या झोपडपट्याचे एसआरए योजनेच्या नावाखाली घरांचा छुपा सर्व्हे करण्यात येत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अधिकृत व अनधिकृत झोपडपट्टया शोधून काढण्यासाठी विमानतळ प्राधिकरणाने झोपडपट्टयांचा सर्व्हे करण्याची जबाबदारी एमएमआरडीएकडे सोपवली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे,

(४) तद् नुसार याप्रकरणी दोषी आढळून आलेल्या व्यक्तींवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता (०५-०९-२०१५) :**(१) व (२) अशी बाब निदर्शनास आली नाही.

मुंबई येथील छत्रपती शिवाजी आंतरराष्ट्रीय विमानतळाचे विस्तारीकरण करण्याच्या दृष्टीकोनातून विमानपतन प्राधिकरणाच्या जमिनीवरील झोपड्यांचे पुनर्वसन करण्याच्या अनुषंगाने तेथील झोपडपट्टीधारकांची सर्वेक्षणाअंती पात्रता निश्चित करण्याच्या अनुषंगाने शासनाच्या दि.१३.०७.२००७ च्या अधिसूचनेन्वये उपजिल्हाधिकारी (अति/निष्का) तथा सक्षम प्राधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यानुसार उपजिल्हाधिकारी (अति/निष्का), मुलुंड/भांडुप/घाटकोपर व कुर्ला यांच्याकडे विमानपतन प्राधिकरणाच्या क्षेत्रावरील झोपड्यांची पात्रता निश्चिम करणे, ही जबाबादारी सोपविण्यात आली आहे. शासन निर्णय दि. २२.०७.२०१४ व दि. १६.०५.२०१५ अन्वये दि. १.१.२००० पर्यंतच्या झोपड्या संरक्षणपात्र ठरविण्याबाबत निश्चित केलेल्या कार्यपध्दतीनुसार संबंधित उपजिल्हाधिकाऱ्यांकडून या प्रकरणी सर्वेक्षणाची कार्यवाही चालू करण्यात आली आहे.

तथापि, विमानपतन प्राधिकरणाच्या बाधित जागेपैकी ता.अंधेरी, बामणपाडा येथील जागेवर दि. २५.०६.२०१५ रोजी संबंधित अधिकारी सर्वेक्षणास गेले असता स्थानिक रहिवाश्यांनी विरोध केल्याने तेथील झोपड्यांचे सर्वेक्षण करता आले नाही.

या प्रकरणीमुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची प्रकल्प समन्वयक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वानवडी येथील अपंग कल्याणकारी संस्थेमधील स्वच्छता गृहात अस्वच्छता निर्माण झाल्याबाबत

**(१३) १०८६० (०७-०४-२०१५). श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वानवडी येथील अपंग कल्याणकारी संस्थेमधील स्वच्छता गृहात अस्वच्छता निर्माण झाली आहेत, त्यामुळे विद्यार्थ्यांचे आरोग्य धोक्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिकेने या बाबींकडे अक्षम्य दुर्लक्ष केल्यामुळे हा प्रश्न दिवसेदिवस गंभीर होत आहे म्हणून संस्थेने न्याय मिळावा यासाठी मागणीचे प्रश्न मा.मुख्यमंत्री आणि मा.आरोग्यमंत्र्यांना जानेवारी २०१५ च्या दरम्यान पाठविले, हे खरे ही आहे काय,

(३) असल्यास, पुणे महानगरपालिका एकीकडे स्वच्छता अभियान राबविताना दुसरीकडे कार्यालयाच्या गलिच्छ वस्ती निवारण विभागाकडून उडवाउडवीची उत्तरे दिली जात आहेत, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबींकडे गांभीर्याने लक्ष देऊन शासन कोणती कार्यवाही करणार आहे वा करीत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-१०-२०१५) :**(१) वानवडी येथील अपंग कल्याणकारी संस्था ही खाजगी संस्था असून, पुणे महानगरपालिकेच्या अधिपत्याखाली नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या अधिपत्याखालील येणारा संपूर्ण भाग लोकसंख्येची घनता, वाहतुकीची भेडसावणारी समस्या**

**(१४) १२०२९ (०७-०४-२०१५). श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या अधिपत्याखालील येणारा संपूर्ण भाग लोकसंख्येची घनता, वाहतुकीची भेडसावणारी समस्या निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या परिसरात एमएमआरडीए तर्फे मेट्रो रेल सुरु करण्याबाबत निर्णय घेणार आला आहे काय,असल्यास, त्याचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, याबाबतचा सर्व्हे रिपोर्ट शासनास प्राप्त झाला आहे काय, यावर शासनाने कोणती उपाययोजना केली आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०९-२०१५) :**(१) होय.

(२) नाही.

तथापि, ठाणे-भिवंडी-कल्याण मार्गासाठी योग्य सार्वजनिक जलद वाहतूक व्यवस्थेची तांत्रिक - आर्थिक सुसाध्यता तपासून सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्रधिकरणाकडून मे.डी. अपोलोनिया, इटली आणि टी.सी.ई. मुंबई यांची सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. सदर प्रकल्पाच्या अंतिम मसूदा अहवाल माहे जानेवारी, २०१६ पर्यंत अपेक्षित आहेत.

(३) नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई उपनगरातील अंधेरी (पश्चिम) येथील नक्षत्र गार्डनच्या बाजूला शासनाच्या आरक्षित जागेवर समाजकंटकानी अतिक्रमण केल्याबाबत**

**(१५) १२१८० (०८-०४-२०१५). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरातील अंधेरी (पश्चिम) येथील नक्षत्र गार्डनच्या बाजूला शासनाच्या आरक्षित जागेवर परदेशी नावाच्या समाजकंटकानी अतिक्रमण केले असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अतिक्रमण निष्कासीत करण्याकरिता कुठल्या प्रकारची कारवाई केली आहे,

(३) असल्यास, सदर अतिक्रमण निष्कसीत न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०९-२०१५) :**(१) हे खरे आहे.
(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सदर अतिक्रमणावर दिनांक २०.०२.२०१५ रोजी निष्कासनाची कारवाई करण्यात आली आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महिला शौचालयाचा पुणे पॅटर्न राज्यातील महापालिकांनी राबविण्याबाबत**

**(१६) १३६२० (०७-०४-२०१५). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महिला शौचालयाचा पुणे पॅटर्न राज्यातील महापालिकांनी राबवावा असे निर्देश मा.उच्च न्यायालयाने दि.१७ नोव्हेंबर, २०१४ रोजी वा त्यादरम्यान शासनाला दिले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रश्न भाग (१) बाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-१०-२०१५) :**(१) होय,
"मिळून साऱ्या जणी" या स्वयंसेवी संस्थेने मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे पुणे शहरातील महिलांच्या स्वच्छता गृहाबाबत जनहित याचिका क्र. ९८/२०११ दाखल केली आहे, सदर प्रकरणी दिनांक १८ नोव्हेंबर, २०१४ रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान नवी मुंबई, कल्याण-डोंबिवली, नागपूर इ. महापालिका ज्याप्रमाणे स्वयंसेवी संस्थेच्या मदतीने महिला स्वच्छता गृहाबाबत कार्यवाही करण्याबाबत तोंडी आदेश दिले आहेत,
(२) मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार आवश्यक कार्यवाही करण्याबाबत आयुक्त, महानगरपालिका (सर्व) व आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांना कळविण्यातत आले आहे,
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई-नाशिक महामार्गावर ठाणे ते शहापूर दरम्यान विना परवानगी १२ हजार वेअर हाऊस गोदामे बाधली असल्याबाबत**

**(१७) १४२५८ (०४-०४-२०१५). श्री.सरदार तारासिंह (मुलुंड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई-नाशिक महामार्गावर ठाणे ते शहापूर दरम्यान विना परवानगी १२ हजार वेअर हाऊस गोदामे बाधली असल्याचे जानेवारी २०१५ च्या शेवटच्या आठवड्यात शासनाच्या निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहु गोदामांना रस्ता देण्यासाठी शासनाने मुंबईला पाणी पुरवठा करणारी तानसा-वैतरना धरणाची पाईप लाईन आहे, त्या पाईपलाईन वरून रस्ता बाधण्याची परवानगी दिली आहे हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू रस्ता दुरूस्ती दरम्यान तानसा-वैतरणा धरणाची पाईपालाईन फुटल्यास, शासन जबाबदार राहाणार आहे काय,
(४) असल्यास, याबाबत सखोल चौकशी करून शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-१०-२०१५)** :(१) हे अंशत: खरे आहे.
(२), (३), (४) व (५) तानसा वैतरणा धरणाचे पाईप लाईप वरुन रस्ता बांधलेला नसून गाव जोडरस्ता तसेच पूर्वीचा राष्ट्रीय महामार्ग ते गाव असे बांधलेले रस्ते पुर्वीचे आहेत.

---

**लोणार (जि.बुलढाणा) नगरपालिकेचे मालमत्ता धारकांकडे थकबाकी असल्याबाबत**

**(१८) १५०३६ (०७-०४-२०१५). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लोणार (जि.बुलढाणा) नगरपालिकेचे मालमत्ता धारकांकडे रुपये १ कोटी ४३ लाख थकबाकी असून ९० टक्के करवसुली न झाल्यास शासनाच्या सहायक अनुदानापासून नगरपरिषद वंचित राहण्याची शक्यता निर्माण झाल्याचे दिनांक ४ फेब्रुवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मालमत्ता थकबाकीमुळे लोणार नगरपरिषदेला शासनाकडून मिळणाऱ्या सहायक अनुदानापासून मुकावे लागणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, थकबाकीची कारणे काय आहेत या प्रकरणी चौकशी करुन तातडीने करवसुली करण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या आहेत व याबाबतची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०९-२०१५)** :(१) होय.
(२) होय.
(३) नगरपरिषद लोणर ही क वर्ग नगरपरिषद आहे. वसूलीसाठी कर्मचारी कमी असल्याने या नगरपरिषदेच्या कराची थकबाकीमध्ये दिवसेंदिवस वाढ होत होती. शासनाचे आदेशानुसार एकूण मागणीमधून शासकीय मागणी वगळून खाजगी वसूली ९० टक्के बंधनकारक केल्यामुळे नगरपरिषेदेने सन २०१४-१५ च्या वसुलीसाठी सर्व कर्मचाऱ्यांची ४ पथके तयार करुन प्रत्येक करधारकांचे घरोघरी भेटी देवून एकूण मागणी रुपये १,४३,७४,०६७/- मधील शासकीय मागणी रु. १,०८,५८,९६५/- पैकी रु.१,०१,२५,२६५/- म्हणजेच ९३.२४ टक्के एवढी वसुली केलेली आहे.

---

## कुर्ला (प.) मुंबई येथील गांधी मैदान हे खेळाच्या मैदानाकरीता राखीव असून या मैदानावर अनधिकृत बांधकाम होत असल्याबाबत

**(१९) १५०७६ (०८-०४-२०१५). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुर्ला (प.) मुंबई येथील गांधी मैदान हे खेळाच्या मैदानाकरीता राखीव असून या मैदानावर अनधिकृत बांधकाम झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनधिकृत बांधकाम तोडण्याकरीता स्थानिक रहिवाशी यांनी जिल्हाधिकारी व महानगरपालिका यांच्याशी वेळोवेळी पत्रव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अनधिकृत बांधकाम तोडण्याकरीता शासनाकडून कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता (०५-०९-२०१५) :**(१) हे खरे आहे.

मौजे कुर्ला, ता.कुर्ला येथे न.भू.क्र.५८९ या मिळकतीच्या एकूण २५०५ चौ.मी. क्षेत्रापैकी काही क्षेत्रावर खेळाचे मैदान असून सदर मैदानावर तात्पुरत्या स्वरुपाचे अतिक्रमणे सतत होत असतात.

(२) हे खरे आहे.

(३) उक्त न.भू.क्रमांकामधील ६५८ स्के.यार्ड या जागेमध्ये २९ झोपड्या, १ शौचालय, १ मंदिर व १ मदरसा हे अतिक्रमणे आळढून आली आहेत. २९ झोपड्यांपैकी ५ झोपड्यांमध्ये झोपडीधारकांचे वास्तव्य आढळून आले आहेत. उर्वरीत २४ झोपड्या बंद स्थितीत आढळून आल्या आहेत. प्रस्तुत झोपड्यांच्या निष्कासनाच्या अनुषंगाने सक्षम प्राधिकारी यांच्याकडे मा.उच्च न्यायालयाच्या आदेशान्वये सुनावणीअंती पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील मरिनड्राईव्ह सी रोड येथील शिवसदन या जुन्या उपकरप्राप्त इमारतीचे अनधिकृत बांधकाम केल्याबाबत.

**(२०) १५७३० (०७-०४-२०१५). श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मरिनड्राईव्ह सी रोड येथील शिवसदन या जुन्या उपकरप्राप्त इमारतीच्या ६ व्या मजल्यावरील टेरेसवर, इमारत मालकाने १९८० ते २००० या कालावधी ६ सदनिकासहीत दोन प्लॅटचे अनधिकृत बांधकाम केल्याचे महानगरपालिकेच्या असेसमेंट एक्सट्क्ट अहवालानुसार सिध्द होवूनही अद्याप यावर शासन तथा महानगरपालिकेकडून अनधिकृत बांधकामावर कोणतीच कारवाई करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणी गेले २ वर्षात अनेक लोकप्रतिनिधींनी कागदोपत्री पुराव्यानुसार लेखी तक्रार निवेदन दिले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू प्रकरणात बॉम्बे टाऊन प्लॉनिंग ॲक्ट १९६६ हा कायदा रद्द झालेला असतांनाही, या कायद्यांतर्गत बोगस मंजूर प्लॅनची माहिती देवून इमारत मालकाने अनधिकृत बांधकाम नियमित करण्याची केलेली कार्यवाही निदर्शनास येऊनही अद्याप यावर शासनाने कोणती कारवाई केली नाही, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन अनधिकृत बांधकामावर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०९-२०१५)** :(१) हे खरे नाही. सदर प्रकरणी इमारत मालकास बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे मनपा कायदा कलम ४८८ नुसार दिनांक १०.०५.२०१२ अन्वये स्थळ निरीक्षणाकरीता नोटी बजावण्यात आली होती. प्रस्तुत प्रकरणी बृहन्मुंबे महानगरपालिकेकडे उपलब्ध असलेल्या अभिलेखानुसार तसेच महापालिकेच्या इमारत प्रस्ताव खात्याकडे उपलब्ध असलेल्या इमारत नकाशा नोंदवहीनुसार, सदर इमारतीवर अतिरिक्त सहावा मजला बांधण्याकरिता इमारत मालकाद्वारे दिनांक १४.०३.१९६६ रोजी बृहन्मुंबई महानगरपालिकेस प्रस्ताव सादर केल्याचे व त्यास दिनांक ०८.०३.१९६७ रोजी मंजूरी दिली असल्याचे दिसून येते. यास्तव इमारत मालकाने सादर केलेल्या मंजूर नकाशाच्या आधारे स्थळ पाहणी केली असता, सदर इमारतीच्या सहाव्या मजल्यावर मंजूर नकाशाप्रमाणे बांधकाम असल्याचे आढळून आले.

बृहन्मुंबई महानगरपालिकेकडील अभिलेखानुसार सदर इमारतीच्या मालमत्ता करासाठी प्रथम करनिर्धारण सन १९६१-६२ पूर्वीपासून असल्याचे व सन १९७६-७७ पासून उपलब्ध अभिलेखानुसार सदर इमारत तळमजला + ६ मजले अशी करनिर्धारीत आहे. तथापि सदर इमारतीच्या सहाव्या मजल्यावरील परिवास्तूचे करनिर्धारण १९७६-७७ ते सन २०००-१० या कालावधीच्या निरीक्षण उताऱ्यामध्ये केलेले आहे.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) सदर इमारतीच्या टेरेसवरील सहाव्या मजल्याच्या बांधकामास बृहन्मुंबई महानगरपालिकेने मंजूरी दिलेली असल्यामुळे सद्य:स्थितीत कोणत्याही कारवाईची आवश्यकता भासत नाही.

---

### सोलापूर येथील यंत्रमाग कामगारांनी काम बंद आंदोलन केल्याबाबत

**(२१) १६५४६ (१२-०८-२०१५). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर येथील यंत्रमाग कामगारांचे काम बंद आंदोलन माहे मे, २०१५ मध्ये वा त्या सुमारास बरेच दिवस चालू असतांना त्याची दखल शासनाने न घेतल्यामुळे तेथील कामगारांवर ओढवलेली उपासमारीची वेळ यामुळे एका कामगाराचा मृत्यु झाला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्याबाबत शासनाने चौकशी केली आहे, चौकशीत काय आढळून आले आहे व मृत कामगारांच्या कुटुंबीयांना दिलेला मदतीचा तपशील काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत?

**श्री. प्रकाश मेहता (१५-१०-२०१५)** :(१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**औरंगाबाद येथील छावणी परिषदेच्या टोलनाक्यावर दंडात्मक कारवाई केल्यानंतर पुन्हा अधिक पैसे घेतले जात असल्याची तक्रार**

**(२२) १६५७३ (१३-०८-२०१५). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद येथील छावणी परिषदेच्या टोलनाक्यावर दंडात्मक कारवाई केल्यानंतर पुन्हा अधिक पैसे घेतले जात असल्याची तक्रार भ्रष्टाचार निर्मुलन अभियानाने मुख्याधिकारी यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय
(२) असल्यास, उपरोक्त टोलनाक्यावर सीसीटीव्ही बसवावेत व त्यांचे नियंत्रण छावणी परिषदेमध्ये ठेवावे त्याप्रमाणे टोल नाक्यावर तक्रार पेट्या ठेवण्यास व संबंधित ठेकेदारावर कारवाई करावी अशी मागणी स्थानिकांनी केली हे खरे आहे काय
(३) असल्यास, उपरोक्त मागणीवर शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे
(४) अद्याप कार्यवाही केली नसल्यास होणा-या विलंबाची कारणे काय आहेत

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-१०-२०१५)** :(१) होय,
(२) होय,
(३) सध्याच्या कंत्राटदाराचे कंत्राट दिनांक ०७ सप्टेंबर, २०१५ रोजी संपत असून नवीन करारनामा मा. उच्च न्यायलय, खंडपीठ औरंगाबाद यांच्याकडून पडताळणी करुन घेण्यात येत असून त्यात टोलनाक्यावर सीसीटीव्ही बसवून त्याचे नियंत्रण छावणी परिषदेमध्ये ठेवण्याबाबतच्या अटीचा समावेश करण्यात आला आहे,नविन सुधारित करारनाम्याच्यावेळी छावणी परिषदेमार्फत टोल नाक्यावर तक्रार पेटया बसविण्याचे येणार आहेत, असे मुख्य अधिशासी अधिकारी, छावणी परिषद, औंरगाबाद यांनी कळविले आहे,
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सायन कुर्ला दरम्यान मिठी नदीच्या काठावर ३० एकर जागेवर महाराष्ट्र निसर्ग उद्यान पुर्नविकास करण्याबाबत**

**(२३) १६५८३ (१२-०८-२०१५). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सायन कुर्ला दरम्यान मिठी नदीच्या काठावर ३७ एकर जागेवर महाराष्ट्र निसर्ग उद्यान पुर्नविकासाच्या नावाखाली एमएमआरडीएने एका खाजगी कंपनीला देण्याचा करार केल्याचे माहे मे-२०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या उद्यानाच्या व्यवस्थापनाचे आणि त्याबाबतचे निर्णय घेण्याचे अधिकार असणारे राज्याचे मुख्य सचिवांना अंधारात ठेवून एमएमआरडीएने निर्णय घेतल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या महाराष्ट्र निर्सग उद्यान पुर्नविकासच्या प्रकरणाची चौकशी करण्यात आली काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढाळून आले व त्यानुसार सदर प्रकरणी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-१०-२०१५) :**(१) महाराष्ट्र निसर्ग उद्यानाची जागा ही कोणत्याही खाजगी अथवा बाह्य कंपनीला हस्तांतरत केलेली नसून सदर जमिन महाराष्ट्र निसर्ग उद्यान सोसायटी यांच्याकडेच आहे,

(२) आबझर्वर रिसर्च फाऊडेशन यांना महाराष्ट्र निसर्ग उद्यानाच्या व्यापक रुपातरासंदर्भात ज्ञानभागिदार (Knowledge Partner) म्हणून घेण्याकरिता प्राधिकरणाने त्यांचे सोबत सामंजस्य करार केलेला आहे, या करारानुसार, आबझर्वर रिसर्च फाऊडेशन या व्यापक रुपांतराकरीता जागतिक स्पर्धा घेतील व विजेत्याची निवड करुन त्यासोबत अंतिम बृहत योजना आराखडा तयार करण्यास प्राधिकरणास मदत करतील,

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर जिल्हयातील मंगळवेढा तालुक्याच्या मातीमध्ये विविध धातु आढळल्याबाबत**

**(२४) १६६७४ (१८-०८-२०१५). श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **खनिकर्म मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हयातील मंगळवेढा तालुक्याच्या मातीमध्ये सोने, चांदी, प्लॅटिनम इत्यादी अमुल्य धातू असल्याचे मंगळवेढा तालूक्यातील कदम गुरुजी महाविद्यालयात केलेल्या प्रयोगात आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रयोगाची उचित दखल अद्याप शासकीय अधिका-यांनी घेतलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रयोगाबाबत उदासिनता दाखविण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता (१५-०९-२०१५) :**(१) डॉ. एस डी कदम यांनी मंगळवेढा परिसरात सोने, चांदी, इ खनिजांचा आढळ असल्याबाबत संशोधनाची कागदपत्रे शासनास सादर केली होती. राज्यामध्ये चांदी, सोने इ मौल्यवान खनिजांचे संशोधन भारतीय भूवैज्ञानिय सर्वेक्षण विभाग, नागपूर यांनी केलेले असल्याने डॉ कदम यांचे संशोधनाचे कागदपत्र त्यांचेकडे तांत्रिक अभिप्रायासाठी संचालक, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय, नागपूर यांचेद्वारे पाठविण्यात आले होते. डॉ. कदम यांनी सादर केलेल्या संशोधन कागदपत्रात नमूद केलेले निष्कर्ष प्रचलित तांत्रिक निकषाच्या आधारे मान्य करता येण्यासारखे नसल्याचे मत भारतीय भूवैज्ञानिय सर्वेक्षण विभाग यांनी व्यक्त केले आहे.

सन २००९-१० दरम्यान मंगळवेढा येथे भारतीय भूवैज्ञानिय सर्वेक्षण आणि भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय, नागपूर यांचे मार्फत संयुक्त सर्वेक्षण करणेत आले होते. त्यात कोणतेही मौल्यवान धातू आढळलेले नाहीत.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भोकर (ता.जि.नांदेड) येथील प्रोत्साहन विशेष बालकामगार प्रशिक्षण केंद्राच्या कर्मचाऱ्यांना तब्बल दोन वर्ष तीन महिन्यापासून वेतन मिळाले नसल्याबाबत**

**(२५) १७१२७ (१४-०८-२०१५). श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.मधुकरराव चव्हाण (तुळजापूर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोकर (ता.जि.नांदेड) येथील प्रोत्साहन विशेष बालकामगार प्रशिक्षण केंद्राच्या कर्मचाऱ्यांना तब्बल दोन वर्ष तीन महिन्यापासूनचे वेतन मिळाले नसल्याचे माहे, मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्रममंत्रालय भारत सरकारच्या वतीने जिल्हयात एकूण १० प्रोत्साहन विशेष बालकामगार प्रशिक्षण केंद्र चालत असून शिक्षणापासून कोसो दूर असणारे गिट्टी फोडणे, वेठबिगारी करणे, बांधकाम बिगारी, भंगार गोळा करणे, गॅरेज काम, हॉटेल काम, रेल्वेत खाद्यपदार्थ विकणे, बुट पॉलिस करणे अशा लहान लहान असलेल्या ५०० बालकामगारांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे काम केंद्रामार्फत १२० कर्मचारी सातत्याने करीत असून या कर्मचाऱ्यांना मागील दोन वर्षापासून वेतन मिळाले नसल्याने त्याची गैरसोय होत आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कर्मचाऱ्यांना थकित वेतन मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता (१६-११-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे,

(२), (३) व (४) भोकर (ता.जि.नांदेड) येथील विशेष बाल कामगार प्रशिक्षण केंद्रात कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या मानधनाची देयके विहित मुदतीत सादर न होणे, त्रुटींची पुर्तता करण्यासंदर्भातील कागदपत्रांची पुर्तता न होणे, जिल्हाधिकारी कार्यालयातील संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या देयकावर स्वाक्षऱ्या न होणे आदी तांत्रिक व प्रशासकीय कारणांमुळे देयके मंजूरीस झालेल्या विलंबामुळे संबंधितांचे मानधन वेळेवर झालेले नाही, ही वस्तुस्थिती आहे.

तथापि, आता प्रस्तुतची देयके मंजूर झाली असून सप्टेंबर, २०१३ ते एप्रिल, २०१४ या कालावधीतील मानधनाची रक्कम संबंधितांना अदा करण्यात आली आहे. माहे मे, २०१४ पासूनच्या मानधनाची रक्कम केंद्र शासनाकडून अनुदान प्राप्त होताच वाटप करण्यात येणार आहे.

---

## मुंबई म्हाडा, मुंबई महानगरपालिका, जिल्हाधिकारी आणि खाजगी जागेवरील एसआरए योजना

**(२६) १७४७६ (११-०८-२०१५). ॲड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई म्हाडा, मुंबई महानगरपालिका, जिल्हाधिकारी आणि खाजगी जागेवरील एसआरए योजना या रहिवाश्यांना पात्र अपात्र प्रक्रियेत अडकल्या असल्यामुळे या योजना सुरु करण्यासाठी पात्र अपात्र प्रक्रिया अधिक सुलभ करण्याची गरज असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एसआरए मध्ये पात्र अपात्र प्रक्रियेतील योजनांमधील त्रुटी दुर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता (२८-०९-२०१५) :**(१) व (२) महाराष्ट्र झोपडपट्टी (सु.नि.व.पु) अधिनियम १९७१ मध्ये सुधारणा करुन संरक्षणपात्र झोपडीसाठी अर्हता दिनांक १ जानेवारी, १९९५ याऐवजी १ जानेवारी, २००० असा सुधारीत करण्यात आला आहे. त्यास अनुसरुन दि. १.१.२००० या त्यापूर्वीच्या झोपडीत प्रत्यक्ष वास्तव्य असणाऱ्या झोपडीवासियांचा निवारा निश्चित करण्यासाठी शासन निर्णय, गृहनिर्माण विभाग दि. २२ जुले, २०१४ अन्वसे मार्गदर्शक तत्वे विहित केलेली होती. झापडपट्टी पुनर्वसन योजनेतील पात्रता तपासण्याच्या कार्यपध्दतीत अधिक सुसुत्रता/सुलभता यावी म्हणून उक्त मार्गदर्शक तत्वे अधिक्रमित करुन सुधारीत मार्गदर्शक तत्वे शासन निर्णय दि. १६ मे,२०१५ अन्वये निर्गमित केलेली आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**एमएमआरडीएने सुरु केलेली मोनो रेल्वे ठाणे, भिवंडी व कल्याण येथे प्रस्तावित केल्याबाबत**

**(२७) १७५२२ (११-०८-२०१५). श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एमएमआरडीएने सुरु केलेली मोनो रेल्वे सध्या तोट्यात असल्याने प्रस्तावित असलेल्या ठाणे, भिवंडी व कल्याण येथे सुरु होणारा तीन हजार कोटीचा मोनोचा प्रकल्प रद्द करण्याची नामुष्की एमएमआरडीए प्रशासनावर आली असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मोनो रेल्वेमार्ग व्यवहार्य नसल्याचा निर्वाळा सल्लागाराने दिला असून सदरहू मोनोरेल्वे मार्ग व्यवहार्य बनविण्याकरिता शासन आवश्यक कार्यवाही करणार वा करीत आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-१०-२०१५) :**(१) व (२) मुंबई मोनोरेल प्रकल्पाचा दुसरा टप्पा सुरु झाल्यानंतर मोनोरेलचे उत्पन्न वाढणे अपेक्षित आहे. ठाणे-भिवंडी-कल्याण या मार्गाकरिता मोनोरेल प्रकल्पाचा तांत्रिक-आर्थिक सुसाध्यता अभ्यास करण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने नियुक्त केलेल्या मेसर्स राईटस या सल्लागाराने सदर नियुक्त आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य नाही, अशी शिफारास केली आहे, ठाणे-भिंवडी-कल्याण मार्गाकरिता सार्वजनिक जलद वाहतुक व्यवस्थेचा या परिसरातील होणारा संभाव्य जलद विकास व प्रवाशांची संख्या विचारात घेवून तांत्रिक-आर्थिक सुसाध्यता आणि सविस्तर प्रकल्प अहवाल पुन्हा तयार करण्यासाठी मेसर्स डी अपोलोनिया,इटली व टीसीई, मुंबई यांची माहे एप्रिल, २०१५ मध्ये मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत नियुक्ती करण्यात आली असून सदर प्रकल्पाचा अंतिम मसुदा माहे जानेवारी, २०१६ पर्यत अपेक्षित आहे,

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे महानगरपालिका प्रशासनाने शहरात फेरीवाला धोरण राबविण्याबाबत**

**(२८) १७६२२ (११-०८-२०१५). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.योगेश टिळेकर (हडपसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र सरकारच्या फेरीवाला धोरणानुसार पुणे महानगरपालिका प्रशासनाने शहरात केलेल्या सर्वेक्षणात २६ हजाराहून अधिक पथारी व्यवसायिकांची नोंदणी झाली आहे. या व्यावसायिकांकडून शुल्क आकारणी आणि दंड वसूल करण्यात येणार आहे मात्र गेल्या दहा महिन्यापासून या संबंधिताचा प्रस्ताव मुख्य सभेत मंजूर होवू शकलेला नाही. त्यामुळे पालिकेला ९० कोटी रूपयांच्या उत्पन्नावर पाणी सोडावे लागले असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उत्पन्न वाढीच्या या पर्यायावर शासनाने निर्णय घेवून काय कार्यवाही केली आहे, वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-१०-२०१५) :**(१) सदर बाब अंशतः खरी आहे.

नविन फेरीवाला धोरणाअंतर्गत आकारावयाच्या परवाना शुल्क वाढीचे प्रस्तावास महासभेची मंजूरी मार्च, २०१५ पूर्वी मिळेल, या आधारे सन २०१५-१६ चा अर्थसंकल्प मंजूर करण्यात आला आहे. सदर अर्थसंकल्पात फेरीवाला अनुज्ञापत्रापोटी रुपये १२ कोटी तसेच पथारी व व्यावसायिक फी पोटी रुपये २७ कोटी अशी एकूण रुपये ३९ कोटी संभाव्य उत्पन्न महासभेने मान्य केलेली आहे.

तथापि, सदर प्रस्तावास महासभेची मंजूरी मिळणे प्रलंबित आहे. सदर प्रस्तावास मान्यता मिळाल्यास सन २०१५-१६ या चालू वर्षाकरिता उक्त रकमेची वसुली होणे शक्य आहे. परिणामी महानगरपालिकेचे उत्पन्न बुडाले, असे म्हणता येणार नाही.

(२) वाढीव दराच्या मान्यतेकरिता प्रलंबित असलेल्या प्रस्तावास महासभेची मान्यता मिळणेकामी महापालिका प्रशासनाकडून पाठपुरावा करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील यंत्रमाग उद्योगांमध्ये काम करत असलेल्या कामगारांच्या मागण्यांबाबत**

**(२९) १७९४० (१४-०८-२०१५). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री. हनुमंत डोळस (माळशिरस), श्री. शशिकांत शिंदे (कोरेगाव) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सोलापूर,कोल्हापूर,माळेगाव, आणि भिवंडी परिसरातील यंत्रमाग उद्योगांमध्ये काम करत असलेल्या लाखो कामगारांच्या मागण्यांवर निर्णय घेण्यासाठी शेकडो यंत्रमाग कामगारांनी मुंबईतील आझाद मैदानामध्ये दि २० मे २०१५ रोजी मोर्चा काढून आंदोलन केलेले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी केलेल्या मागण्यांचे थोडक्यात स्वरुप काय आहे तसेच राज्यातील यंत्रमाग कामगारांच्या समस्या सोडविण्यासंदर्भात कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, उक्त प्रश्न भाग (१) व (२) मधील प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता (०५-११-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे, दिनांक २० मे, २०१५ रोजीचे यंत्रमाग कामगार संघटना संयुक्त कृती समिती, सोलापूर यांचे मा.मुख्यमंत्री महोदय यांना अग्रेषीत केलेले निवेदन अ.मु.स (वस्त्रोद्योग) यांचेमार्फत या विभागाकडे उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे.

(२) सदरच्या निवेदनामध्ये यंत्रमाग कामगरांना किमान वेतन मिळवून देण्यात यावे, यंत्रमाग उद्योगात किमान वेतन कायद्याची अंमलबजावणी करणे, यंत्रमाग कामगारांना ८ तासाचे काम निश्चित करणे, घर बांधणीसाठी शासनाच्या वतीने प्रत्येकी ५ लाख रुपये देण्यात यावे व यंत्रमाग कामगार कल्याण मंडळ स्थापन करावे या मागण्यांचा समोवश आहे,

यंत्रमाग कामगार कल्याण मंडळाची स्थापना करण्याबाबत कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे.

(३) यंत्रमाग कामगारांसाठी स्वतंत्र मंडळ गठीत करण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन असून त्यावर शासनस्तरावर कार्यवाही चालू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्ह्यात सेवानिवृत्तीधारकांना एम्पालॉईज प्रॉव्हिडंट फंड (ईपीएफ निवृत्ती वेतन) मिळण्याबाबत**

**(३०) १८४८१ (१४-०८-२०१५). श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यात ह्यातीच्या दाखल्याचे अद्ययावतीकरण रेंगाळल्यामुळे सेवानिवृत्तीधारकांना एम्पालॉईज प्रॉव्हिडंट फंड (ईपीएफ निवृत्ती वेतन) माहे जानेवारी, २०१५ वा त्या दरम्यान मिळाले नाही हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे कायव त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, तदनुसार सेवानिवृत्तीधारकांना प्रलंबित असलेली पेन्शन व इतर लाभाचे पैसे देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता (१३-१०-२०१५) :**(१), (२) (३) व (४)

कोल्हापूर जिल्हातील सेवानिवृत्तीधारकांपैकी ज्या सेवानिवृत्तीधारकांचे माहे नोव्हेंबर, व डिसेंबर, २०१४ पर्यंतचे जीवन प्रमाणपत्र (हयातीचे दाखले) बँकांकडून पाठविण्यात आलेले आहेत, अशा सेवानिवृत्तीधारकांचे निवृत्तीवेतन माहे जानेवारी, २०१५ पासून सुरु करण्यात आलेले आहे.

ज्यांचे हयातीचे दाखले आलेले नाहीत किंवा माहिती अपूर्ण आहे अशा सेवानिवृत्तीधारकांचे हयातीचे दाखले संपूर्ण माहितीसह बँकांमार्फत मागविण्यात आले आहेत.

ज्या सेवानिवृत्तीधारकांना आजपर्यंतचे हयातीचे दाखले देण्यात आलेले आहेत, अशा सर्व सेवानिवृत्तीधारकांना माहे जानेवारी, २०१५ पासून आजतगायताचा सेवानिवृत्ती वेतनातील फरक देण्यात आलेला आहे.

हयातीच्या दाखल्यांचे अद्ययावतीकरण करण्याची बाबकेंद्र शासनाच्या अधिपत्या खालील कर्मचारी भविष्य निधी संगठन कार्यालयाच्या अखत्यारितील असून त्याबाबतची कार्यवाही पुढील वर्षापासून सुरु होणार आहे.

---

**इचलकरंजी (जि.कोल्हापूर) येथील कामगारांनी त्यांच्या मागण्यासाठी सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालयावर मोर्चा नेल्याबाबत**

**(३१) १८४९१ (११-०८-२०१५). श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इचलकरंजी (जि.कोल्हापूर) येथील ४ हजार बांधकाम कामगारांनी दिनांक १५ मे २०१५ रोजी वा त्यासुमारास त्यांच्या मागण्यासाठी सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालयावर मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मोर्चेकऱ्यांच्या मागण्या काय आहेत व त्यापैकी कोणकोणत्या मागण्या मान्य करण्यात आल्या आहेत,

(३) असल्यास, सदर मागण्यांच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता (१४-१०-२०१५) :**(१) हे खरे आहे.

(२) व (३) कोल्हापूर विभागातील इचलकरंजी कार्यालयातील सुमारे ४००० कामगारांना १५ दिवसात ३००० रुपये योजनेचा लाभ द्यावा, ७००-८०० अर्जाची पडताळणी करुन आठ दिवसात कामगारांना वेगवेगळ्या योजनेचा लाभ द्यावा, आरटीजीएस न झालेल्या कामगारांना धनादेश द्यावेत, मयत कामगारांच्या वारसाला योजनेचा लाभ द्यावा, अंत्याविधीचे धनादेश तिस-या दिवशी द्यावेत, शिष्यवृत्ती व इतर योजनेच्या रक्कमेत दुपटीने वाढ करावी, नैसर्गिक मृत्यू प्रकरणी कामगारांना रु. १ लाख मिळावेत, मेडीकेअर टी.पी.ए.प्रस्ताव दिरंगाई विरोधी कारवाई करणे, घरासाठी रु. ५ लाख अनुदान व रु.१० लाख कर्ज द्यावे, मंडळावर सिटू चा प्रतिनिधी घेणे, कामगारांच्या मुलीच्या डिलीव्हरीकरीता निधी मिळणे, कामगार कार्यालयातील व कल्याणकारी मंडळातील रिक्त जागा भरणे इ. मागण्या मोर्चेक-यांच्या होत्या.

रु.३०००/- आर्थिक सहाय्य मिळण्याबाबतच्या मागणीस अनुसरुन पात्र कामगारांना उक्त योजनेतर्गत निधी वाटप करण्याची कार्यवाही इचलकरंजी कार्यालयामार्फत सुरु आहे. इचलकरंजी येथील पात्र बांधकाम कामगारांच्या पाल्यांना रु. ९,९५,०००/- इतके शिष्यवृत्तीचे वाटप करण्यात आले आहे. आरटीजीएस न झालेल्या कामगारांचा बँकेकडून चौकशी अहवाल घेऊन, ४९ कामगारांना लाभ प्रदान करण्यात आले आहे. मयत झालेल्या २१ कामगारांच्या वारसास रु. २,५२,०००/- इतका लाभ प्रदान करण्यात आला आहे,

अंत्यविधी योजनेंतर्गत लाभ देण्याबाबतचा एकही प्रस्ताव इचलकरंजी कार्यालयाकडे प्रलंबित नाही. तसेच आरोग्य विमा योजनेची मुदत संपलेली आहे.

दि. २८ मे, २०१५ रोजी महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाचे गठण करण्यात आले असून मंडळाचे कामकाज गतिमान होण्याच्या दृष्टीने बाह्य यंत्रणेमार्फत कंत्राटी पध्दतीने कर्मचाऱ्यांच्या सेवा घेण्यात आल्या आहेत, काही योजनांचा आढावा घेऊन मूल्यमापनाअंती योजना पुढे चालू ठेवावी अथवा काही नवीन योजना सुरु करण्याबाबत कार्यवाही विचाराधीन आहे,

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शिवडी न्हावा-शेवा हार्बर लिंकसाठी (एमटीएचएल) द्यावा लागणा-या जमिनीचे बीपीटी आणि जेएनपीटी नव्याने मुल्यांकन करणार असल्याबाबत**

**(३२) १८९४३ (११-०८-२०१५). श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिवडी न्हावा-शेवा हार्बर लिंकसाठी (एमटीएचएल) द्यावा लागणा-या जमिनीचे बीपीटी आणि जेएनपीटी नव्याने मुल्यांकन करणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-१०-२०१५) :**(१) होय,

(२), (३) व (४) मुंबई पारबंदर प्रकल्पाकरिता लागणाऱ्या जमिनीचे मुल्यांकन माफक दराने करण्याबाबत केंद्रीय बंदर विभाग यांना दिनांक १८ सप्टेंबर, २०१४ च्या पत्राद्वारे विनंती केली होती, त्यानुसार मुंबई पोर्ट ट्रस्ट यांनी दिनांक ११ मे, २०१५ रोजीच्या पत्रान्वये मुंबई पारबंदर प्रकल्पाकरिता लागणाऱ्या जमिनीचे मुल्यांकन प्राधिकरणाला कळविले आहे, तद्नंतर २५ जून २०१५ रोजी सचिव (बंदरे), केंद्र शासन यांचेबरोबर झालेल्या बैठकीमध्ये मुंबई पोर्ट ट्रस्ट यांना बदर नियमावली २०१४ च्या अधीन राहून प्रकल्पासाठी लागणाऱ्या जमीनीच्या मुल्यांकनामध्ये महाराष्ट्र शासनास अधिक सवलत देता येईल किंवा कसे याची पडताळणी करण्याबाबत सूचना दिल्या आहेत, या अनुषंगाने मुंबई पोर्ट ट्रस्ट व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांमध्ये दिनांक १० जुलै, २०१५ रोजीच्या बैठकीमध्ये चर्चा झाली यामध्ये मुंबई पोर्ट ट्रस्टतर्फे मुल्यांकनातील काही बाबींचा फेरविचार करावा असे ठरले याबाबतची कार्यवाही मुंबई पोर्ट ट्रस्टकडून प्रगतीपथावर आहे.

---

**सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये सोने आणि प्लॅटिनमच्या खाणी असल्याबाबत**

**(३३) १८९६१ (१२-०८-२०१५). श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **खनिकर्म मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये रेडी, सातेली, तिरोडा आणि कळणे या गावात सोने आणि प्लॅटिनमच्या खाणी असल्याचे माहे एप्रिल, २०१५ च्या शेवटच्या सप्ताहात उघडकीस आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सोने आणि प्लॅटिनमचे बेकायदा उत्खनन होवू नये म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता (२८-०८-२०१५)** :(१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ठाणे व नवनिर्मित पालघर जिल्हयाचे वाढते नागरीकरणामुळे अग्निशमन यंत्रणा स्थापन करण्याबाबत

**(३४) १९०४० (११-०८-२०१५). श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे व नवनिर्मित पालघर जिल्हयाचे वाढते नागरीकरण व त्यामुळे निर्माण झालेली मोठी शहरे कार्यरत असलेल्या महानगरपालिका तसेच एमएमआरडीचे कार्यक्षेत्र विचारात घेता या दोन्ही जिल्हयासाठी स्वतंत्र प्रभावी, सक्षम व अद्यावत अशी अग्निशमन यंत्रण अद्याप अस्तित्वात नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अद्ययावत अशी नियंत्रणासाठी उभारण्याबाबत शासनाने काय उपाययोजना करणार आहे वा करीत आहे,
(३) असल्यास, सदर यंत्रणा केव्हापासून अस्तित्वात येईल,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-१०-२०१५)** :(१), (२) व (३) हे खरे नाही, ठाणे व पालघर जिल्हयातील महानगरपालिका व नगरपालिकेत अग्निशमन यंत्रणा कार्यरत असून महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियानाच्या निकषानुसार त्यांना अग्निशमन यंत्रणा सक्षमीकरणासाठी अनुदान देण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई दुकाने व आस्थापना कायदा १९४८ च्या कलम ३३ अन्वये महिला कर्मचा-यांना रात्री ९.३० नंतर काम करण्यास मनाई असल्याबाबत**

**(३५) १९१९७ (११-०८-२०१५). श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई दुकाने व आस्थापना कायदा १९४८च्या कलम ३३ अन्वये महिला कर्मचा-यांना रात्री ९.३० नंतर काम करण्यास मनाई केली असताना पिंपळगाव बसवंत (ता.निफाड, जि.नाशिक) येथील टोल नाक्यावर महिला कर्मचा-यांना रात्रभर रस्त्यावरील टोल नाक्यावर धोकादायक परिस्थितीत काम करावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी कामगार उपायुक्त, नाशिक यांच्याकडे दिनांक १४ ऑक्टोबर, २०१३ रोजी वा त्या सुमारास तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबधितांवर कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता (०५-११-२०१५) :**(१) अंशत: खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

मा.आमदार श्री.अनिल कदम, विधानसभा सदस्य यांनी दि.१५/१०/२०१३ रोजी कामगार उप आयुक्त, नाशिक यांचेकडे तक्रार केली होती.

(३) व (४) होय.

महाराष्ट्र दुकाने व आस्थापना अधिनियम, १९४८ अंतर्गत करण्यात आलेल्या दिनांक १८/१०/२०१३ रोजी तपासणी भेटीत उक्त अधिनियमाच्या कलम ८, ६२, ३९, ३३(३) याचा भंग केल्यामुळे आस्थापनेविरुध्द प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी, पिंपळगाव, बसवंत यांचे न्यायालयात खटला क्रमांक - ७९४/२०१३, दिनांक ०३.१२.२०१३ रोजी दोषी आस्थापनेस मा.न्यायालयाने रुपये ४०००/- दंड केला आहे.

---

**मुंबईतील डॉ.भिमराव आंबेडकर विद्यालय कुकरेजा वसाहतीमध्ये शाळेच्या पुर्नवसनाबाबत**

**(३६) १९६४३ (११-०८-२०१५). श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील "डॉ.भिमराव आंबेडकर विद्यालय कुकरेजा वसाहत बि.नं.३४, ३६ वाशीनाका, चेंबूर शाळेच्या पुनर्वसनाबाबत" या विषयावरील दिनांक १९ मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास निवेदन अणुशक्तीनगर, मुंबई येथील लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांना दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनाच्या संदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-१०-२०१५)** :(१) होय.

(२) प्रश्नाधिन शाळेचे बांधकाम अतिक्रमणाच्या स्वरुपात होते व ते आणिक पांजळपोळ जोडरस्त्याने बाधित झाले होते. सदर शाळेला कुकरेजा वसाहत येथे इमारत क्र. ३४, ३६ मध्ये ३,३६५ चौ.फुटाचे १५ गाळे वितरित करुन सन २००७ मध्ये पुनर्वसन करण्यात आले आहे. शाळेच्या चालकांच्या मागणीनुसार स्वतंत्र भूखंडावर इमारत बांधून तेथे शाळेचे पुनर्वसन करण्याची तरतूद धोरणात नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात स्थानिक संस्था कर (एलबीटी) न भरणाऱ्या थकबाकीदार व्यापाऱ्यांसाठी अभय योजना लागू करण्याबाबत**

**(३७) २०३७३ (१२-०८-२०१५). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.मनोहर भोईर (उरण), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात स्थानिक संस्था कर (एलबीटी) न भरणाऱ्या थकबाकीदार व्यापाऱ्यांसाठी अभय योजना लागू करण्याचा निर्णय शासनाने दिनांक १२ मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेचे स्वरुप काय आहे व त्याची अंमलबजावणी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, सदर कर न भरणाऱ्या व्यापाऱ्यांकडून थकबाकीसह नियमानुसार व्याज आणि दंडाची रक्कम मिळाली असली तरी एलबीटीमुळे उत्पन्नात घट झालेल्या महापालिकांना फायदा झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर योजना राबविण्याची कारणे काय आहेत व राज्यातील महानगरपालिकांना या संदर्भात वाढीव अनुदान देण्यात येणार आहे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०९-२०१५)** :(१) होय, शासनाने दिनांक ३ जून २०१५ रोजीच्या अधिसुचनेनुसार व्यापाऱ्यांकडील थकीत रक्कमा वसुल करण्यासाठी स्थानिक संस्था कर अभय योजना २०१५, ही २५ महानगरपालिका क्षेत्रामध्ये लागू केली आहे,

(२) अभय योजना कालावधीमध्ये थकीत मूळ कराची रक्कम भरल्यास त्यावरती आकारण्यात आलेले व्याज व दंड माफ करण्याची या योजनेमध्ये तरतुद करण्यात आली आहे,

(३) व (४) i) व्यापाऱ्याकडील थकीत रकमा वसुल झाल्यामुळे या निधीचा उपयोग महानगरपालिकांना विकास कामांवरती करणे शक्य होणार आहे, त्यामुळे या योजनेचा फायदा सर्वच महानगरपालिकांना होणार आहे,

ii) व्यापाऱ्यांकडील थकीत रकमा वसुल झाल्याने महानगरपालिकेच्या कर्मचारी/अधिकारी यांना थकबाकी वसुलीच्या कामांमधून मुक्तता मिळणार असून इतर विकासात्क कामांवरती या कर्मचाऱ्यांचा वापर करणे शक्य होणार आहे.

---

**न्हावा-शेवा ते शिवाडी या सागरी सेतू बांधण्याबाबत**

**(३८) २०५७१ (३१-०७-२०१५). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.रणजित कांबळे (देवळी), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) न्हावा-शेवा ते शिवाडी या २२ किलोमिटरच्या सागरी सेतू बांधण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मुंबई ट्रान्सहर्बर लिंग प्रकल्पातील कुठलीच कंपनी पुढे न आल्याने निविदा प्रक्रिया माहे सप्टेंबर, २०१३ मध्ये रद्द करुन एमएमआरडीए ने इंजिनिअरिंग प्रॉक्युरमेंट ॲण्ड कन्स्ट्रक्शनसोबत (ईपीसी) हा प्रकल्प पूर्ण करण्याचा निर्णय घेतला आहे हे हीखरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकल्पाच्या बांधकामासंदर्भात माहे जुलै, २०१४ मध्ये जायका बँकेच्या प्रतिनिधींनी प्रस्तावित ट्रान्सहार्बर लिंक मार्गाचे सर्वेक्षण केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकल्पाच्या कामाची सद्यःस्थिती काय आहे वा या प्रकल्पाचे काम तातडीने हाती घेण्याबाबत कोणकोणत्या उपाययोजना केल्या आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-१०-२०१५) :**(१) व (२) होय,

(३) व (४) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातर्फे मुंबई पारबंदर प्रकल्पाची (MTHL) अंमलबजावणी जपान इंटरनॅशनल को-ऑपरेशन एजेन्सी (JICA) या जपानी शासन पुरस्कृत संस्थेकडून कर्ज प्राप्त करुन इंजिनिअरिंग प्रोक्युरमेंट अँड कन्स्ट्रक्शन (ईपीसी) या तत्वावर करण्याचे प्रस्तावित आहे. सदर प्रकल्पाची अंमलबजावणी (JICA) या जपानी शासन पुरस्कृत संस्थेकडून कर्ज प्राप्त करुन इंजिनिअरिंग प्रोक्सुरमेंट अँड कन्स्ट्रक्शन (ईपीसी) तत्वावर करण्याबाबतचा प्रस्ताव केंद्र शासनास पाठविण्यात आला आहे. (JICA) या संस्थेकडून प्रकल्पाचा अभ्यास (appraosal) प्रगतीपथावर असून त्यांचेकडून कर्ज मिळविण्याच्या प्रस्तावास मान्यता मिळाल्यावर प्रकल्प राबविण्यास्तव पुढील कार्यवाही करण्याचे प्रस्तावित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील पदविधर अंशकालीन कर्मचाऱ्यांबाबत**

**(३९) २१२८७ (२९-०८-२०१५). श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.विजय रहांगडाले (तिरोडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पदवीधर अंशकालीन कर्मचारी ह्यांचे बाबत सन २०१४ मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री ह्यांचेकडे केलेल्या मागणीच्या अनुषंगाने दिनांक ३ मार्च, २०१५ रोजी सहसचिव,

रोजगार व स्वयंरोजगार विभागाद्वारे काही प्रस्ताव तयार करण्याचे निर्देश दिले होते, हे खरे आहे काय,
(२) पदवीधर अंशकालीन कर्मचारी ह्यांचे प्रश्न सोडविण्याकरीता शासनस्तरावर काय कार्यवाही सुरु आहे, याबाबत काही शासन धोरणात्मक निर्णय घेण्यात येणार आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-१०-२०१५)** :(१) होय.
(२) याबाबत प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### जिल्हयातील विविध शासकीय रुग्णालयामध्ये सुरक्षा रक्षकांच्या नेमणूका केल्याबाबत

**(४०) २१७४९ (११-०८-२०१५). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.जीवा गावित (कळवण) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रायगड जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ तर्फे जिल्हयातील विविध शासकीय रुग्णालयामध्ये ४७ सुरक्षा रक्षकांच्या नेमणूका केल्या, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ४७ सुरक्षा रक्षकांना गेल्या वर्षभरापासून आरोग्य विभागामार्फत वेतन अदा न केल्याने सुरक्षा रक्षकांच्या कुटूंबांवर उपासमारीचे संकट आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वर्षभर वेतन प्रलंबित ठेवण्याची कारणे काय आहेत, वेतन थकीत ठेवणा-या अधिका-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता (१४-१०-२०१५)** :(१) होय, हे खरे आहे.
(२) हे अंशतः खरे आहे. कारण मंडळाने केलेल्या सततच्या पाठपुराव्यामुळे १४ रुग्णालयांकडून सुरक्षा रक्षकांचे ५ ते ६ महिन्यांचे वेतन वसूल करुन सुरक्षारकक्षकांना अदा करण्यात आलेले आहे.
(३) नोंदित आस्थापनेत तैनात केलेल्या सुरक्षा रक्षकांचे वेतन व लेव्ही नोंदीत आस्थापनेने प्रत्येक महिन्याचे ५ तारखेपर्यंत मंडळामध्ये जमा करणे अनिवार्य असतांनाही संबंधित रुग्णालयांकडून विहित कालावधीत वेतन प्राप्त न झाल्याने सुरक्षा रक्षकांचे वेतन प्रलंबित राहिले होते. सदरहू थकीत वेतन वसूल करण्याचेदृष्टीने मंडळाने रुग्णालय प्रमुख यांचेसोबत दि.१७/४/२०१५ रोजी बैठक घेतली असून थकीत वेतन व लेव्ही वसूलीकरीता संचाक, आरोग्य सेवा महाराष्ट्र राज्य व उप संचालक, आरोग्य सेवा, मुंबई तसेच सर्व रुग्णालय प्रमुख यांना दि.२६/५/२०१४, १९/११/२०१४, ५/१२/२०१४, १५/५/२०१५ व दि.२/९/२०१५ रोजीच्या पत्रान्वये सूचित केले आहे. तसेच महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियम व कल्याण)

अधिनियम १९८१ च्या कलम १४ (२) अन्वये महसूल वसूल कारवाई करण्याकरीता नोटीसा बजावून वसूलीची कार्यवाही सुरु केलेली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नागपूर गृहनिर्माण व क्षेत्र विकास यांनी नागपूर गोधनी रेल्वे येथे शेत जमिनी अधिगृहीत केलेल्याबाबत**

**(४१) २२१०३ (११-०८-२०१५). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर गृहनिर्माण व क्षेत्र विकास यांनी सन १९८९ मध्ये नागपूर गोधनी रेल्वे येथील अनेक शेत जमिनी अधिगृहीत केलेल्या होत्या, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नागपूर गृहनिर्माण व क्षेत्र विकास यांनी अधिगृहीत केलेल्या शेत जमिनीवर कुठलीही योजना राबिवली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यातील वनही शेत मालक भुमीहीन झाले, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, नागपूर गोधणी रेल्वे येथील शेत जमिनी परत मिळण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी गृहनिर्माण मंत्री यांना निवेदन दिले आहे, सदर निवेदनावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता (१३-१०-२०१५) :**(१) व (२) नगरी जमिनी कमाल धारणा कायद्यांतर्गत नागपूर नागरी समूहात सक्षम प्राधिकार तथा अप्पर जिल्हाधिकारी, नागपूर नागरी समूह (नागरी जमिन कमाल धारणा) यांनी मौजा गोधनी रेल्वे येथील अतिरिक्त घोषित केलेल्या व शासनास वर्ग झालेल्या जमिनीपैकी १८.३९ हेक्टर जमिनीचा ताबा सन १९९०-९१ या कालावधीत नागपूर मंडळाला प्राप्त झाला. त्यापैकी मंडळाने १७.७६ हेक्टर जमिनीवर योजनांचे नियोजन केलेले आहे व प्रत्यक्षात १२.०५५२ हेक्टर जमिनीवर योजना राबवून लाभार्थ्यांना गाळे/भूखंडाचे वाटप केले आहे. उर्वरित योजना राबविण्याचे दृष्टीने कार्यवाही सुरु आहे.
(३) जमिन, सक्षम प्राधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी, नागरी जमीन कमाल धारणा कार्यालयाने अतिरिक्त घोषित केली आहे त्यामुळे मालक भूमिहीन होण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) व (५) नागपूर गोधनी रेल्वे येथील शेतजमीन परत मिळण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी यांचेकडून निवेदन प्राप्त झाले आहे. अत्यल्प, अल्प व मध्यम उत्पन्न गटातील गरजूंकरीता मोठ्या प्रमाणावर गृहनिर्माण योजना राबविण्यासाठी म्हाडा, नगापूर मंडळास सदर जमीनीची आवश्यकता आहे. त्यामुळे सदर जमीन जमीनमालकास परत करण्याची विनंती मान्य करता येणार नाही.

---

**मानखुर्द, गोवंडी (मुंबई पूर्व उपनगर) येथील सुशिक्षित तरुणांसाठी रोजगार निर्माण करण्याबाबत**

**(४२) २२८५१ (११-१०-२०१५). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मानखुर्द, गोवंडी (मुंबई पूर्व उपनगर) स्थानिक विभागातील तसेच विधानसभा क्षेत्रातील सुशिक्षित तरुणांसाठी त्यांच्या पर्याप्त रोजगाराविषयी स्थानिक जागरुक नागरिक, सामाजिक कार्यकर्ते, लोकप्रतिनिधी तसेच विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी यांनी मा.मुख्यमंत्री, मा.राज्यमंत्री (कौशल्य विकास व उद्योजकता), जिल्हाधिकारी (मुंबई पूर्व उपनगरे), जिल्हा कौशल्य विकास व उद्योजकता अधिकारी (रोजगार विनिमय) यांच्याकडे तांत्रिक / अतांत्रिक / अहर्ताकारी सेवा पदांसाठी माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे शिफारस केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी माहे मे, २०१५ अखेर पर्यंत कोणती कार्यवाही पूर्ण करण्यात आली वा येत आहे,

(३) असल्यास, सदरचे काम किती कालावधीत हाती घेण्यात येईल वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे कोणती ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-१०-२०१५) :**(१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सुरक्षा रक्षक मंडळाच्या नोंदीत असलेल्या सुरक्षा रक्षकांच्या वेतनाबाबत**

**(४३) २३१२० (१०-०८-२०१५). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या अखत्यारित असलेल्या 'सुरक्षा रक्षक मंडळा'च्या नोंदीत असलेल्या सुमारे २० हजारावर सुरक्षा रक्षकांच्या वेतनावर आकारण्यात येत असलेल्या लेव्हीमध्ये गेल्या २० वर्षात सुधारणा न झाल्यामुळे या कामगारांना कल्याणकारी योजनांतून देण्यात येणाऱ्या फायद्यात मोठी विसंगती निर्माण झाली असल्याची बाब माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कामगारांच्या अडचणी सोडविण्यासाठी लेव्हीची पुनर्रचना होणे गरजेचे असल्याने शासनाने निर्णय घेवून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता (१४-१०-२०१५) :**(१) व (२) हे खरे नाही. कारण सुरक्षा रक्षक मंडळ बृहन्मुंबई व ठाणे अंतर्गत नोंदीत सुरक्षा रक्षकांच्या वेतनावर आकरण्यात येणा-या लेव्हीच्या दरात आतापावेतो सन १९८८, १९८९, १९९२ व सन १९९८ अशी चार वेळा सुधारणा करण्यात आली आहे. सध्याच्या लेव्हीचा प्रचलित दर ४६.७५ % असून त्याची विगतवारी पुढीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| भविष्यनिर्वाह निधी | १२.०० % |
| उपदान | ४.०० % |
| सानुग्रह अनुदान | ८.०० % |
| रजेचा पगार | ६.०० % |
| भरपगारी रजा | १.०० % |
| गणवेश निधी | ४.०० % |
| का.रा.वि.यो. | ४.७५ % |
| प्रशासकीय निधी | ५.०० % |
| संकीर्ण निधी | १.६७ % |
| एकूण | ४६.७५ % |

या व्यतिरिक्त सुरक्षा रक्षकांना वैद्यकीय फायदे, अपघात विमा योजना, इ.लाभ मंडळामार्फत दिले जातात. त्यामुळे सद्यःस्थितीत लेव्हीच्या दरात सुधारणा करण्याची आवश्यकत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**भारत सरकारच्या बाल कामगार कायद्या दुरुस्तीमध्ये कौटुंबिक उद्योग यामध्ये काम करणा-या बाल कामगारांना किंवा त्यांच्या पालकांना दंड किंवा शिक्षेची तरतुद करण्याबाबत.**

**(४४) २३३३६ (१४-०८-२०१५). डॉ.अनिल बोंडे (मोर्शी) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भारत सरकारच्या बालकामगार कायदा दुरुस्तीमध्ये कौटुंबिक उद्योग यामध्ये काम करणा-या बाल कामगारांना किंवा त्यांच्या पालकांना दंड किंवा शिक्षेची तरतुद नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत राज्य शासनाने राज्याचे कौटूंबिक उद्योगाबाबत बाल कामगार धोरण ठरविले आहे काय,

(३) असल्यास, केंद्र शासनाच्या बालकामगार कायद्यामध्ये राज्य शासन बदल करु इच्छिते काय,

(४) नसल्यास, याबाबत ची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता (१५-१०-२०१५) :**(१) हे खरे आहे.

(२) याबाबत राज्याचे कौटुंबिक उद्योग बाल कामगार धोरण अद्याप राज्य शासनाने ठरविलेले किंवा प्रस्तावित केलेली नाही.

(३) व (४) केंद्र शासनाच्या सुधारित बाल कामगार कायद्याच्या मसूद्यामध्ये बदल करण्याचे अधिकार राज्य शासनास नाहीत. तसेच अशा प्रकारचा बदल सुचविण्याचा प्रस्ताव सद्य:स्थितीत राज्य शासनाच्या विचाराधीन नाही.

---

**पाताळगंगा (ता.खालापुर, जि.रायगड) येथील परिसरामध्ये रिलाईन्स कपंनीकडून कामगाराची पिळवणूक होत असल्याबाबत**

**(४५) २३६४१ (१२-०८-२०१५). श्री.प्रशांत बंब (गंगापूर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.सुधाकर भालेराव (उदगीर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाताळगंगा (ता.खालापुर, जि.रायगड) येथील परिसरामध्ये रिलायन्स इंडस्ट्रीज लि. कंपनीमध्ये पॉलीस्टर धागा-नाफ्ता, पेट्रोकेमिकल इ. उत्पादन करतांना येथे २२०० हजार कामगार कामे करतात ते केवळ आठ हजार मानधनावर परंतू जादा मोबदला मागितल्यास विविध कारणे दाखवून निलंबित केले जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता (१४-१०-२०१५) :**(१) हे अंशत: खरे आहे.

मे.रिलायन्स इंडस्ट्रिज लिमिटेड, पाताळगंगा या आस्थापनेच्या पेट्रो डिव्हीजन व पॉलिएस्टर डिव्हीजन येथे एकूण ११०० कायम कामगार, अधिकारी व कर्मचारी कार्यरत असून सुमारे २४०० कंत्राटी कामगार आहेत. (त्यापैकी १८०० कंत्राटी कामगार संपावर आहेत.)

नियमित कामगारांना रु. २५ ते ४० हजार वेतन मिळते तर कंत्राटी कामगारांना रु. ९ ते ११ हजार वेतन देण्यात येते.

५ कंत्राटीदारांनी त्यांच्याकडील ७ कंत्राटी कामगारांना विनाचौकशी, विनानोटीस काढून टाकले आहे. प्रकरणी औद्योगिक विवाद अधिनियम, १९४८ च्या कलम २(अ) मध्ये कामगार आयुक्त कार्यालयाकडून समेट कार्यवाही करण्यात येत आहे. तर २ कंत्राटदारंनी त्यांच्याकडील ७ कंत्राटी कामगारांना आरोप पत्र देऊन निलंबित केले आहे. सदर प्रकरणी चौकशी अधिकाऱ्यांमार्फत खातेनिहाय चौकशी सुरु आहे.

(२) वरील प्रमाणे चौकशी सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

**बेरोजगार सेवा संस्थांच्या मागण्याबाबत**

**(४६) २४८६७ (११-०८-२०१५). श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात जवळपास ८ हजार ५०० बेरोजगार सेवा संस्था कार्यरत असून बेरोजगार सेवा संस्थांच्या मागण्या गेल्या १५ वर्षापासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बेरोजगार सेवा संस्थांच्या प्रलंबित मागण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-१०-२०१५) :**(१) राज्यात जुलै, २०१५ अखेर ८२८७ बेरोजगार सेवा सहकारी संस्था स्थापन असून त्यापैकी ३३४३ संस्था कार्यरत आहेत. तथपि, सदर संस्थांच्या मागण्या १५ वर्षापासून प्रलंबित असल्याचे बाब खरी नाही.
(२) बेरोजगारांच्या सेवा सहकारी संस्थांच्या मागण्यांपैकी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कामामध्ये मजूर सहाकरी संस्थंना देण्यात येत असलेल्या ३३ टक्के कामामध्ये १६.५० टक्के वाटा मिळणे व विना निविदा कामाची मर्यादा रु.५.०० लाखावरुन रु.३०.०० लाख करणे ह्या मागण्या अमान्य करण्यात आल्या असून सदर सस्थांच्या वर्गीकरणाची कार्यवाही करण्यासाठी संबंधितांना योग्य त्या सूचना देण्यात आल्या आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पंढरपूर व मंगळवेढा तालुक्यातील गौण खनिज निधीस पात्र नसलेल्या ग्रामपंचायतींबाबत**

**(४७) २५९६४ (१०-०८-२०१५). श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **खनिकर्म मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पंढरपूर व मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्यातील गौण खनिज निधीस पात्र नसणा-या ग्रामपंचायतींनाही निधी वाटप करण्यात आला असल्याची गंभीर बाब दिनांक ९ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पंढरपूर व मंगळवेढा तालुक्यातील गौण खनिज निधीतून जी कामे करणे अपेक्षित होती ती न करता इतर कामे करण्यास ग्रामपंचायतींना परवानगी देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन संबंधितांवर कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता (२८-०८-२०१५) :**(१) नाही.
(२), (३) व (४) खनिज विकास निधीच्या वापर वाटपा संदर्भात सुधारित मार्गदर्शक तत्वे दिनांक ०१.०८.२०१२ च्या शासन निर्णयान्वये विहीत करण्यात आली आहेत. हा शासन निर्णय निर्गमित झाल्यापासून अद्‌याप पर्यंत सोलापूर जिल्ह्यातील पंढरपुर व मंगळवेढा तालुक्यातील ग्रामपंचायती क्षेत्रातील कामांचे प्रस्ताव महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळाकडून शासनास प्राप्त झालेले नाहीत.

खनिज विकास निधीतून ग्रामपंचायतींना कोणतेही अनुदान दिले जात नाही.

---

**कामगार कल्याण केंद्र चिखली (जि.बुलडाणा) येथील कार्यालयाच्या जागेचे भाडे थकीत असल्याबाबत**

**(४८) २७३२१ (१०-०८-२०१५). श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कामगार कल्याण केंद्र चिखली (जि.बुलडाणा) येथील कार्यालयाच्या जागेचे भाडे जागा मालकाला माहे जानेवारी, २०१२ ते दिनांक ३१ डिसेंबर, २०१२ एकूण रु. ४६४२०/- थकित असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सहा. कल्याण आयुक्त, मुंबई यांना स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी लेखी पत्र व्यवहार करुनही त्यावर कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने जागा मालकाचे भाडे अदा करण्यासंदर्भात टाळाटाळ करणारे अधिकारी / कर्मचारी यांच्यावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता (१५-१०-२०१५) :**(१) हे खरे नाही माहे जाने २०१२ ते ३१ डिसेंबर, २०१२ या कालावधीचे भाडे थकीत नाही मात्र जाने २०१३ ते मार्च २०१३ पर्यंतचे भाडे घरमालकाने स्विकारलेले नाही.
(२) घरमालकाची स्थानिक कार्यलयाशी पत्रव्यवहार केलेला आहे. परंतु भाडेवाढीबाबतचा लोकप्रतिनिधींचा पत्रव्यवहार प्राप्त झाला नाही. जानेवारी, २०१३ ते जुलै, २०१३ पर्यंतचे, जागा रिक्त करेपर्यंतचे, भाडे धनादेश घरमालकास पंजिकृत डाकेने पाठविण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) मालकाने भाडे स्विकारलेले नाही. कार्यालयाने विलंब केलेला नाही.

---

**राज्यातील विविध जिल्हयामध्ये बांधकाम कामगारांची निवारा बांधकाम संघटनेमार्फत आर्थिक फसवणूक झाल्याबाबत**

**(४९) २७४४४ (१०-०८-२०१५). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग, रत्नागिरी, सांगली, सातारा, कोल्हापूर, इचलकरंजी व सोलापूर, सांगली येथे काम करणाऱ्या बांधकाम कामगारांची निवारा बांधकाम संघटनेमार्फत आर्थिक फसवणूक झाल्याची बाब माहे जून, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त संघटनेने शासकीय कार्यालय/अधिकाऱ्यांचे दबाब टाकून खोटी नोंदणी करण्यास भाग पाडत आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तद्नुसार उक्त दोषी संघटनेविरुध्द कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता (१४-१०-२०१५) :**(१) सिंधुदुर्ग व सांगली जिल्ह्यात निवारा बांधकाम संघटनेमार्फत आर्थिक फसवणूक झाल्याच्या घटना निदर्शनास आल्या आहेत.

तथापि, रत्नागिरी, सातारा, कोल्हापूर इचलकरंजी व सोलापूर व ठिकाणी निवारा बांधकाम संघटनेमार्फत आर्थिक फसवणूक झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(२) व (३) सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये सदर संघटना कामगारांकडून ३०० रु. घेवनू सभासद करणे, घरबांधणी प्रस्ताव तयार करणे, कर्ज वाटपाचे फॉर्म वितरीत करणे, अस्तित्वात नसलेल्या योजना अस्तित्वात असल्याचे कामगारांना भासवने, अशा प्रकारे कामगारांची फसवणूक केल्याप्रकरणी पोलिस ठाणे, ओरोस सिंधुदुर्ग येथे आवक क्र. १९/२०१५ अन्वये तक्रार दाखल करण्यात आली होती. त्यानुसार संघटनेचे सरचिटणीस श्री.बचाटे आणि स्थानिक पदाधिकारी श्री.नारिंग्रेकर यांना अटक करुन, न्यायालयासमोर हजर करुन दिनांक ५.६.२०१५ पर्यंत कोठडी देण्यात आली होती.

त्याचप्रमाणे, सदर संघटनेने त्यांच्या मागण्यांसंदर्भात वारंवार जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली तसेच सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालय, सांगली कार्यालयांवर मोर्चे काढलेले आहेत. सदर संघटना बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतनीकरण व विविध योजनांच्या लाभाचे अर्ज गठ्ठयाद्वारे कार्यालयात सादर करत असे व संघटनेकडील नोंदित कामगारांना लाभ मिळावा या करिता सरकारी कामगार अधिकारी व कार्यालयावर वारंवार दबाव टाकत असे. तसेच संघटनेचे सचिव श्री.बचाटे यांनी तत्कालीन सरकारी कामगार अधिकारी यांना अरेरावीची भाषा वापरून कार्यालयामध्ये गोंधळ घातला होता. त्यामुळे सांगली कार्यालयामार्फत दिनांक १८.३.२०१५ रोजी संघटनेविरुध्द गुन्हा (FIR No.८२/२०१५) नोंदविण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**शासकीय सेवेमध्ये विदर्भ, मराठवाडा, खानदेश, या भागातील लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधीतत्व देण्याच्या निर्णयाबाबत**

**(५०) ३४८६३ (२१-०१-२०१६). श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने शासकीय सेवेमध्ये विदर्भ, मराठवाडा, खानदेश या भागातील लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधीतत्व देण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भातील वस्तुस्थिती दर्शक अहवाल तयार करण्यासाठी मंत्रिमंडळाची उपसमिती नेमण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, लोकसंख्येच्या प्रमाणात ज्या भागांना अधिक प्रतिनिधीतत्व यापूर्वी देण्यात आले आहे त्या नेमणूक झालेल्या कर्मचाऱ्यांना अतिरिक्त ठरविण्यात येणार आहे काय,

(४) असल्यास, अशा अतिरिक्त ठरणाऱ्या कर्मचाऱ्यांची सेवा शासन खंडीत करणार आहे काय,

(५) असल्यास, यापूर्वीच्या काळात नागपूर करारानुसार लोकसंख्येच्या प्रमाणात शासकीय सेवेत पुरेसे प्रतिनिधीतत्व न मिळण्याने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०२-२०१६) :**(१) सन १९५३ मध्ये झालेल्या नागपूर करारात शासनाकडील व शासन नियंत्रित उपक्रमांमधील सर्वे श्रेणीतील नोकर भरतीच्यावेळी संबंधित घटकांना लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधीत्व देण्यात यावे. अशी एक तरतूद आहे.

(२) होय.

(३), (४) व (५) या प्रकरणी गठीत करण्यात आलेल्या मंत्रीमंडळ उपसमितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर तो तपासून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.